## नियमीत दिवाणी मुकदमा क्र.४७/२०२५ मधील नि.क्र.२७ खालील आदेश

**०१.** सदरचा अर्ज वादी व प्रतिवादी क्र.१,३,४ यांनी उपअधिक्षक भुमि अभिलेख, कडेगांव यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करून एकत्रीत मोजणी होणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश २६ नियम ०९ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतचा दावा वादीने निरंतरचे ताकिदीकरिता व दावा मिळकतीच्या हद्दी निश्चित होऊन मिळण्यासाठी प्रतिवादींचे विरुध्द दाखल केलेला असून दावा मिळकत मौजे तोंडोली गट क्र.१३०३ ही वादीची मिळकत असून दावा मिळकतीच्या उत्तर बाजूस असलेल्या प्रतिवादींच्या मौजे तोंडोली गट क्र.१३०४ चे दक्षिण बाजूच्या हद्दीलगत आर.सी.सी. घराचे बांधकाम प्रतिवादींनी केले असून प्रतिवादींनी आर.सी.सी. घराच्या दक्षिण बाजूस शोषखड्डा बनविण्याकरीता खड्डा पाडला असून इतर बांधकाम करण्याच्या विचारात असल्याने वादीने प्रस्तुत दावा दाखल केला. परंतु, वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद संपुष्टात आणण्याकरीता मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व गट क्र.१३०४ यांची एकत्रीत चतु:सीमापूर्वक मोजणी होणे गरजेचे आहे. त्यामुळे, मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व गट क्र.१३०४ यांची एकत्रीत चतु:सीमापूर्वक मोजणी होऊन अतिक्रमीत क्षेत्राचे मोजमाप होण्यासाठी मा.उपअधिक्षक भूमिअभिलेख, कडेगांव यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात यावी आणि मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व गट क्र.१३०४ ची कायदेशीर मोजणी होऊन हद्दी कायम करण्यात याव्यात, प्रतिवादीचे घर व शोषखड्डा कोणत्या गटात आहे, तसेच, कोणाचे अतिक्रमण दिसून आल्यास त्याचा उलगडा मोजणी नकाशा व अहवालामध्ये करण्यात यावा अशी वादी व प्रतिवादी क्र.१,३,४ यांनी विनंती केली आहे.

**०२.** वादी व प्रतिवादी यांचे प्रस्तुत दावा व प्रस्तुत अर्जातील कथनांवरुन याठिकाणी उभयपक्षामध्ये असलेला वाद हा दावा मिळकतीच्या हद्दीवरुन असल्याचे दिसून येते. दावा मिळकत गट क्र.१३०३ ही वादीची मिळकत असून गट क्र.१३०४ ही प्रतिवादींची मिळकत आहे तसेच वादीच्या दावा मिळकतीलगत उत्तरेस प्रतिवादीची गट क्र.१३०४ ची मिळकत आहे. सदर बाबी दोन्ही पक्षांना मान्य असल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे दावा

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.11 17:25:08 +0530

मिळकत मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व प्रतिवादींची जमीन मौजे तोंडोली गट क्र.१३०४ या जमिनींची संयुक्तपणे वस्तुस्थितीदर्शक पहाणी व दोन्ही पक्षकारांच्या हद्दीच्या सद्य वस्तुस्थितीबाबत संयुक्त मोजणी करुन क्षेत्र वर्णनासहित सुस्पष्ट नकाशा तयार केल्यास प्रस्तुत खटल्यातील वादाचे कारण जर स्पष्ट होत असेल तर तसे करणे योग्य व न्यायाचे आहे. अशा परिस्थीतीत, उपअधिक्षक भुमी अभिलेख कडेगांव यांना न्यायालयीन आयुक्त म्हणुन नियुक्त करुन त्यांना वादीची दावा मिळकत मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व प्रतिवादींची जमीन मौजे तोंडोली गट क्र.१३०४ या जमिनींची संयुक्तपणे वस्तुस्थितीदर्शक पहाणी तसेच, मुळ मोजणी नकाशा, गुणाकार बुक, फाळणी नकाशा, टिपण बुक, व गटबुक नकाशाप्रमाणेची हद्द विचारात घेवून मोजणी करुन वादीची दावा मिळकत मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व प्रतिवादीची जमीन मौजे तोंडोली गट क्र.१३०४ या जमीन मिळकतींमधील हद्दींसहित मिळकतींचे क्षेत्र वर्णनासहित सुस्पष्ट स्थलदर्शक नकाशा तयार करुन तसा पहाणी अहवाल नकाशासहित या न्यायालयात दाखल करण्याचे निर्देश देणे, योग्य व न्यायाचे होणार आहे. सबब, सदर अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. प्रस्तुत अर्जाचा विचार करता न्यायालयीन आयुक्ताचे एकत्रीत मोजणीचे पाहणी शुल्क दावा मिळकत गट क्र.१३०३ करिता वादीने भरावे व प्रतिवादींची जमीन गट क्र.१३०४ करीता प्रतिवादी क्र.१,३,४ यांनी भरावे असा आदेश करणे उचित ठरेल. त्याअनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

(१) सदरचा अर्ज मंजूर करणेत येतो.

(२) उपअधिक्षक भुमी अभिलेख, कडेगांव यांची याकामी न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करणेत येत आहे.

(३) न्यायालयीन आयुक्त यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी वादीची दावा मिळकत मौजे तोंडोली गट क्र.१३०३ व प्रतिवादींची जमीन मौजे तोंडोली गट क्र.१३०४ या जमिनींची पाहणी करावी व मुळ मोजणी नकाशा, गुणाकार बुक, फाळणी नकाशा, टिपण बुक, व गटबुक नकाशाप्रमाणेची हद्द विचारात घेवून भुमी अभिलेख कार्यालयाकडील जुन्या व नविन गटबुक नकाशा नुसार संयुक्त **एकत्रीत मोजणी** प्रत्यक्ष जागेवर करावी आणि सदर जमिनीतील घराचे बांधकाम, शोषखड्डा व

MADHAVI RAMESH PATKAR

Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.11 17:25:14 +0530

सध्याच्या वहिवाटीच्या हद्दी तसेच, भुमी अभिलेख, कडेगांव यांच्याकडील अभिलेखाप्रमाणेच्या हद्दी इ. नकाशात दाखवून क्षेत्र वर्णनासहित सुस्पष्ट स्थलनिर्देशक नकाशा तयार करुन, त्यांचा नकाशासहित अहवाल सादर करावा.

(४) पहाणी व मोजणी करण्यापूर्वी न्यायालयीन आयुक्त यांनी वादी, सर्व प्रतिवादी व लगत मिळकतींचे कब्जेदार यांना लेखी पुर्व सुचना द्यावी. न्यायालयीन आयुक्त यांनी सदर पहाणी व मोजणी शक्यतो वादी व प्रतिवादी यांच्या उपस्थितीत करावयाची आहे.

(५) वादी व प्रतिवादी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी न्यायालयीन आयुक्त यांना पहाणी व मोजणी कामी आवश्यक ते सहकार्य करावयाचे आहे.

(६) वादी यांना आदेशीत करणेत येते की, दावा मिळकत मौजे तोंडोली गट क्र.१३०३ करीता सदर न्यायालयीन आयुक्ताचे पहाणी शुल्क त्यांनी उपअधिक्षक भुमी अभिलेख कडेगांव यांचे कार्यालयात दि.३०/०४/२०२५ रोजी किंवा त्यापुर्वी भरणेचे आहे. प्रतिवादी क्र.१,३,४ यांना आदेशीत करणेत येते की, मौजे तोंडोली गट क्र.१३०४ करीता सदर न्यायालयीन आयुक्ताचे पहाणी शुल्क त्यांनी उपअधिक्षक भुमी अभिलेख कडेगांव यांचे कार्यालयात दि.३०/०४/२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी भरणेचे आहे.

(७) सदर आदेशान्वये न्यायालयीन आयुक्तांना या आदेशाचे रिट (कमिशन पत्र) त्वरीत पाठवावे. वादी व प्रतिवादी यांनी त्याकरिता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता त्वरीत करावी.

(८) न्यायालयीन आयुक्तांनी दिनांक ३०/०६/२०२५ रोजी किंवा त्यापुर्वी मौजे तोंडोली, ता.कडेगांव, जि.सांगली येथील दावा मिळकत गट क्र.१३०३ व प्रतिवादींची जमीन गट क्र.१३०४ या जमिनींची पहाणी व संयुक्त मोजणी करुन त्यांचा अहवाल सुस्पष्ट नकाशासह या न्यायालयात सादर करावा.

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.04.11 17:25:20 +0530

**दिनांक : ११/०४/२०२५** **(माधवी र.पाटकर)**

**स्थळ : कडेगांव** **सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**

**कडेगांव**